# नित्य नवे रुप तुझे




नित्य नवे रुप तुझे नित्य नव्या कळा
सकाळीच देवा मंगल दर्शन सकळा

पहाटेच येती दूत लालीमा घेऊन
जग जागवाया जणू प्रकाशे अरूण

तुझ्या दर्शनाने येई जाग चैतन्याला
लक्ष लक्ष किरणांनी गाव उजळला

नवा दिस उजाडतो नवी आस डोळा
विरूनही गेला बघ अंधार हा काळा

आश्वासक रुप तुझे किती रे दयाळा
मनी अंतरी रे आता असा हा उजाळा

पक्षी जाती दिगंतरा जाग आली शिवाराला
सोनसळी पिक आले आनंद मनाला

**- नरेंद्र प्रभू**
http://prabhunarendra.blogspot.com/
http://shabdshabd.blogspot.com/